महाराष्ट्र मंडळ डेट्राइट

एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ

# शुभ दिवाळी

## स्नेहबंध - विशेषांक

नोव्हेंबर 2025

आपले मंडळ

**|| Maharashtra Mandal of Detroit ||**

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



## Diwali Chya Shubhechha!

# The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

Lakeshore Healthcare Group
LHG

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

# Pradeep Kokate & Family

## Wishes you all



# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख / कविता - नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | वर्ष संपताना | वर्षा पाथरे | ५ |
| २ | TwentyFiveTwentyOne - एक नितांतसुंदर मालिका | केतकी भाटे | ९ |
| ३ | My Reflections on the Year That Was! | प्राजक्ता केतकर | १४ |
| ४ | मराठी शिकवता शिकवता | ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर (ट्रॉय मराठी शाळा) | १८ |
| ५ | काय झाले? | इयत्ता चौथी (ट्रॉय मराठी शाळा) | १८ |
| ६ | गोधडीचे पापुद्रे | पूनम तोरगल | २२ |
| ७ | कितीदा नव्याने | केतकी भाटे | २७ |
| ८ | Attention Is All You Need | डॉ. प्रणव जगताप | ३१ |
| ९८ | मी "लक्ष्मण" झाले तेव्हाची गोष्ट | डॉ. वीणा शाह | ३८ |
| १० | वर्षभराचे कार्यक्रम आणि मी | उपाध्यक्ष: देवेंद्र चितळे | ४३ |
| ११ | शाईत भिजलेले क्षण: स्वप्न | पल्लवी सप्रे | ४७ |


लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

**संपादक :**
ज्योत्स्ना दिवाडकर

**मुखपृष्ठ:**
अन्विता वाळेकर
अर्चिता बडवे

**रचना व मांडणी :**
अश्विनी राहुल पारठे

# वर्ष संपताना

नमस्कार मंडळी,
**तुम्हा सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा!**

१९९० पासून महाराष्ट्र मंडळ म्हणजे माझं कुटुंबच आहे. गेल्या वर्षी जेंव्हा मंडळाच्या अध्यक्षपदाची संधी मिळाली तेव्हा मला खूप आनंद झाला पण त्याचबरोबर खूप मोठी जबाबदारी हाती घेतल्याची जाणीव झाली. मंडळाच्या प्रथा, सभासदांचे फीडबॅक व सध्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेउन मंडळाच्या दृष्टिकोनातून सर्वात योग्य असा मार्ग आखला.

ह्या वर्षी तुमच्यासारखे उत्साहाने दाद देणारे रसिक प्रेक्षक आमच्या सर्व कार्यक्रमांना हजर होते हे आमचे मोठे भाग्यच आहे. ह्या वर्षी आम्ही वेगवेगळ्या प्रकारचे विविध कार्यक्रम आणले. प्रत्येक कार्यक्रमाला तुम्ही दिलेलं प्रोत्साहन आणि तुम्ही आमच्या समितीच केलेलं कौतुक आम्ही कसे विसरू?

महाराष्ट्र मंडळातर्फे आमच्या सर्व हौशी आणि दिलदार प्रायोजकांचे मनःपूर्वक आभार.

२०२५ च्या समितीने पंचवीसपेक्षा जास्त कार्यक्रम तुमच्यासमोर सादर केले आहेत. कार्यक्रमाची रूपरेषा ठरवणे, पाहुण्यांना आमंत्रित करणे, जेवणाचा मेनू ठरवणे, वाढण्याची व्यवस्था, कार्यक्रमाला लागणारे सर्व सामानाची व्यवस्था, कलाकारांची सोय, कार्यक्रम उत्सहाने पार पडणे, ह्या कशातच त्यांनी काही कमी पडू दिले नाही. 'देता किती घेशील दो कराने' असे भरभरून सहकार्य दिले. संक्रांतीचा गोडवा सर्वच कार्यक्रमात आणला, दिवाळीच्या फराळ व जेवणाने, अन्नपूर्णेने तृप्त केले. तुमचे करावे तेवढे कौतुक आणि मानावे तेवढे आभार कमीच आहेत.

आपल्या मंडळातील ज्येष्ठ मंडळींची मी कृतज्ञ आहे. त्यांनीच हे मंडळ उभे केले आणि हा वारसा जबाबदारीने पुढे नेण्यासाठी आपल्या नवीन पिढीला प्रोत्साहन दिले. ह्या वर्षी बऱ्याच volunteers नी प्रथमच सहभाग घेतला आणि म्हणूनच मंडळाच्या नवीन सभासदांची मी तितकीच आभारी आहे. ४९ वर्षांपूर्वी सुरू झालेले आपले महाराष्ट्र मंडळ छोटेसे होते, आज ते एवढे फोफावले आहे …"इवलेसे रोप लावियले दारी, त्याचा वेलू गेला गगनावरी"

पुढील वर्षीही आपण सगळ्यांनी असाच उत्साह व सहकार्य द्यावे ही विनंती करते. मराठी संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी ते गरजेचे आहे. पुन्हा एकदा आपल्या सर्वांचे आभार मानून कृतज्ञता व्यक्त करते.

धन्यवाद!

आपली आदरपूर्वक,
**– वर्षा पाथरे**






# Dhake Industries

## The Future of Coatings






- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More






- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet market and Customer Specific Requirements

**Global Headquarters**

15169, Northville Rd, Plymouth, MI 48170

734-420-0101

www.dhakeindustries.com




# Deepawali chya Subhecha

## From

## Prabhakar Patil & family

# Dr. Raman Saluja

Wishes you all

## Happy Diwali



## Diwalichya Subhecha



# TwentyFiveTwentyOne - एक नितांतसुंदर मालिका



मुलीने आग्रह केला म्हणून मी नेटफ्लिक्सवरील Korean Webseries बघायला सुरुवात केली आणि अक्षरशः तिच्या आणि तिच्यातील पात्रांच्या प्रेमात पडले.
१५ वर्षांची एक मुलगी अचानक तिच्या आवडीचे बॅले नृत्य सोडून देण्याचा निर्णय घेते आणि आई (ना ही-दो ) रागावली म्हणून तिच्या आजीकडे निघून येते. तिथे तिच्या हातात तिच्या आईची तरूणपणातली रोजनिशी सापडते आणि खरी कथा सुरू होते.
एक उभरती Fencing Athlete ना ही-दो; आधी तिची Idol असलेली, नंतर स्पर्धक आणि त्यानंतर अत्यंत जवळची मैत्रीण झालेली को यू-रिम , शाळेतील हुशार म्हणून ओळखली जाणारी जी स्यूंग-वान, अभ्यासात बेताचा पण शाळेत प्रसिद्ध असणारा मून जी-वुंग आणि last but not the least, ना ही-दो च्या आयुष्यात आलेला बेक यी-जिन हा जबाबदार तरूण, ह्या पात्रांभोवती ही कथा फिरते.

Fencing सुरू ठेवण्यासाठी ना ही-दो ने दिलेला लढा आणि नंतर त्यात मिळवलेले नेत्रदीपक यश, आईशी तिचे असलेले ताणलेले संबंध; आपल्या तोडीची स्पर्धक म्हणून ना ही-दोचा राग राग करणारी पण स्वतःच्या आयुष्यात गरीबीशी लढा देत असलेली को यू-रिम; आणि वडिलांची कंपनी दिवाळखोरीत निघाल्यामुळे महालातून रस्त्यावर आलेला आणि कुटुंबाला सावरू पाहणारा बेक यी- जिन ह्या तीन पात्रांचे मुख्य कथा प्रवाह असून तोच कथेचा आत्मा आहे. पण त्यांना जी स्यूंग-वान आणि मून जी-वुंगच्या उपकथांनी तगडी साथ दिली आहे. त्यांचे धागे एकमेकांत इतके घट्ट विणले आहेत की एक धागा सुटला तर ह्या कथारूपी वस्त्राला अपेक्षित परिणाम साधता येणार नाही.
नायक नायिका म्हणावे असे ना ही-दो आणि बेक यी-जिन असले तरी ही ५ ही पात्रे ह्या कथेचे नायक आहेत. प्रत्येक पात्राची एक गोष्ट आहे, प्रत्येकाची स्वतःची लढाई आहे आणि ती प्रत्येक लढाई आपल्या मनाचा ठाव घेते. आपण कधी ह्या सगळ्यांबरोबर जगायला लागतो कळतही नाही.
मुख्य व इतर सर्वच कलाकार ही मालिका अक्षरशः जगले आहेत. कथेत परिस्थिती सोडून कोणीही खलनायक नाही. आणि कदाचित म्हणूनच आपण कथेशी पटकन एकरूप होतो. आपण आपल्या आयुष्यात ह्या पात्रांना कुठे ना कुठे भेटलोय असे सतत वाटत राहते.
ह्या मालिकेतली मला सगळ्यात आवडलेली गोष्ट म्हणजे ना ही-दो आणि बेक यी-जिनमधले अत्यंत सुंदर पद्धतीने फुलताना दाखवले गेलेले प्रेम. विनाकारण स्पर्श, सतत प्रेम दाखवण्यासाठी केलेली लगट, अंगप्रदर्शन, असभ्य भाषा, बघवणार नाहीत अशी दृश्ये ह्यातले काहीही मालिकेत नाही. आणि तरीही त्या दोघांचे एकमेकांवर असलेले जीवापाड प्रेम आपल्या काळजाला जाऊन भिडते .
ना ही-दो पेक्षा ४ वर्षांनी मोठा असलेल्या बेक यी-जिन ला तिच्याबद्दल वाटणारे प्रेम, पण त्याचबरोबर ती नॅशनल athlete असल्यामुळे आणि थोडी लहान असल्यामुळे तिची काळजी घेण्याची वाटणारी जबाबदारी, प्रेमात पडल्यामुळे तिचा focus हलू नये म्हणून स्वतःला तिच्यापाससून लांब ठेवण्याचे केलेले प्रयत्न आणि ह्या सगळ्याबरोबर, स्वतःला सिद्ध करून कुटुंबाला पुन्हा आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी करावी लागणारी कसरत हे सर्व 'नाम जू-ह्युक' ह्या अभिनेत्याने जबरदस्त पेलले आहे. त्याची देहबोली उत्तम आहे. त्याचा मालिकेतला वावर अतिशय सुखावणारा आहे.
वडील लहानपणी गेल्यामुळे आणि आई सतत व्यस्त असल्यामुळे एकटी पडलेली, खूप अल्लड, बिनधास्त पण आयुष्यात काय करायचे आहे हे स्पष्ट असलेली, बेक यी-जिन चा आधार मिळाल्याने सुखावलेली पण त्याचबरोबर त्यालाही सकारात्मक ऊर्जा देणारी ना ही-दो 'किम ताए-री' ह्या अभिनेत्रीने सुरेख साकारली आहे. अल्लडपणापासून समजूतदारपणाकडे तिचा झालेला प्रवास तिने परिणामकरकरित्या दाखवला आहे.
घरातल्या आर्थिक अडचणींशी दोन हात करत फेन्सिंग मध्ये प्रगती करणारी आणि सुवर्णपदक मिळवून देशाचे नाव उंचवणारी को यू-रिम. तिचे तिच्या आई बाबांशी खूप घट्ट नाते आहे. तिला यश व पैसा मिळवून आई बाबांना सुख द्यायचे आहे. काही घटना अशा घडतात की कुटुंबासाठी तिला एक अतिशय अवघड निर्णय घ्यावा लागतो. मनाविरुद्ध तो घेत असतानाचा को यू-रिमचा ठामपणा 'बोना' ह्या अभिनेत्रीने असा काही दाखवलाय की आपण हलून जातो.

दिग्दर्शन, छायाचित्रण इ. बाजू उत्तम हे वेगळे सांगायला नको. मालिकेतले संवाद तर अक्षरशः लिहून ठेवण्यासारखे आहेत. कितीही लिहिले तरी कमीच असणारी ही मालिका जरूर बघा. पण वेळ काढून बघा. जाता येता बघण्यातली ही मालिका नाही.

**– केतकी भाटे**





**ENDODONTIC ASSOCIATES** Farmington – West Bloomfield

Our office utilizes all the modern technologies and techniques. High-powered operating microscopes, digital radiography, and 3-D high resolution CBCT imaging to treat the most complicated cases for a positive patient experience with predictable outcomes integrated with advanced irrigation and bioceramics for a better healing.

- Conveniently located on Northwestern Highway just north of I-696
- Knowledgeable and compassionate endodontist to ensure clinical excellence
- Highly skilled staff to help provide the most excellent care for your patients
- Convenient parking , just a short walk to the clinic
- Flexible appointments to meet your patients' needs

**Hours of Operation: Monday – Friday 8:30am – 5:00pm | Happy to take your call! 248.737.1360**

**Dr. Amruta Mahajan** received her Bachelor of Dental Surgery from VSPM's Dental College and Research center, Nagpur, India and her certificate in Endodontics from UCLA School of Dentistry, Los Angeles, CA. She was also involved with teaching the second and fourth year dental students. She then worked as a research assistant in endodontics at the Forsyth Institute and Harvard School of Dental Medicine, Boston, MA. Dr. Mahajan then completed her residency in Endodontics from University of Pennsylvania School of Dental Medicine. Dr. Mahajan received the outstanding presenter award and teaching certificate for training general dentists and endodontists in micro-surgical techniques. She has lectured in Endodontics both locally and internationally with an interest in Micro-Surgery and vital pulp therapy. She has recently started up her own CE study clubs, if you are interested in joining please reach out to the office!





**It is our daily commitment to accommodate emergency cases immediately with the highest level of care as we are dedicated to serve as an *"extension of your practice"*.**

**www.rootcanalinfo.com**

# Shubha Deepawali wishes from







---

**Leske Family Dental is committed to providing integrative, quality dentistry to your entire family in a friendly and compassionate environment.**

LESKE
FAMILY DENTAL

## 248-828-3091

5895 JOHN R RD TROY, MI 48085

**DR. AUSTIN LESKE**

**DR. CHASE LESKE**

*LESKEFAMILYDENTAL.COM*

**DR. DANIEL LESKE**



# Rahul Parthe & Family wish you all









*From*

**Prakash & Manda Gandhi**

# My Reflections on the Year That Was!

When Jyotsna asked the Executive Committee to reflect on their MMD experience, one vivid image immediately came to my mind: the sight of our committee members unloading foldable mattresses, pillows, and blankets at the crack of dawn at the Natak venue! The artists had barely got any sleep due to the packed schedule, so it was clear—some rest was essential before the show. The team quickly transformed a corner of the cafeteria into a makeshift ‘rest area’, where they could recharge before lunch and prepare for their performance.

It is no secret that behind every exceptional MMD program is a dedicated group of volunteers working tirelessly in the background. As this year’s MMD Secretary, I had the privilege of witnessing firsthand the incredible efforts that go into fine tuning every detail—the ones we often take for granted while enjoying the food, the decorations, and the show itself.

Every event begins with the meticulous planning of our Logistics team, who ensure that everything needed, from storage to setup, is in place. On the day of the event, they not only transport everything to the venue but also make sure it all gets returned once the program wraps up.

The Audio/Video team, ever the early birds, arrives hours ahead of the crowd, setting up sound and video systems to ensure every note, every frame is perfect for the program.

Meanwhile, the ‘Host and Hospitality’ team handles all logistics involving the artists—from airport pickups to hotel transfers, making sure they have everything they need on-site, as well as in hotels. And yes, that sometimes means drop-offs at 3 am!

The Stage team spends weekends after weekends preparing, assembling, and transporting sets, then dismantling everything once the event is over. This hard work often goes unnoticed, but it is what makes the show possible.

Our Marketing team keeps everyone in the loop with engaging posts, videos, and flyers across social media platforms, the Mandal app, and email—ensuring no one misses out on the excitement.

With over 20 committees within our Mandal, I continue to be in awe of the commitment and hard work from each volunteer. Many of them dedicate 10-12 hours on event day to make sure every detail runs smoothly. And what's even more remarkable is that many of these volunteers have been contributing year after year!

We are incredibly fortunate to have such a passionate and selfless group of people in our Mandal. To all of you—thank you! Your tireless efforts do not go unnoticed, and it is because of you that our Mandal continues to thrive year after year.

– प्राजक्ता केतकर

**दिवाळीच्या**
**हार्दिक शुभेच्छा**

# Dr. Vimal Puri

## Wishes you all




आनंद असेल आज प्रत्येक क्षणात
आनंद असेल प्रत्येक मनात
नवे सुख क्षण वेचायला सुरुवात करुया
दु:खे सारी विसरुन दिवाळीच्या या सणात

## Happy Diwali



ARGHYA
CONCERTS
DETROIT

SAT Math & English Test Prep Classes

The EDucation ENrichment Center

www.ed-en-center.com
248.528.1455
2328 Livernois Road, Troy, MI 48085

We have **experienced teachers** provide a **structured approach** to **help students learn new math concepts, improve language arts abilities, and boost test scores**

**ACT/SAT Test Prep**

- ACT Prep course
- SAT Prep course
- Test practice and reviews

**Math**

- K-5 Math
- Pre-Algebra
- Algebra I
- Algebra II
- Geometry
- Trigonometry
- Pre-Calculus
- Calculus

**English**

- K-12 Language Arts
- Grammar
- Reading Comprehension
- Writing
- Vocabulary



# Diwali Chya Hardik Shubhecha




# || Maharashtra Mandal of Detroit ||




MANDAL

# मराठी शिकवता शिकवता

फेब्रुवारी २०१४. मंडळाचा संक्रांतीचा कार्यक्रम होता. एकीकडे रजिस्ट्रेशन चालू होते तर दुसरीकडे ‘मराठी शाळा’- या आगामी उपक्रमच फलक झळकत होता. अनेक उत्साही पालकांनी आपल्या मुलांची नावं नोंदवली आणि ३ आठवडयांनी -दोन गट करावे लागले इतकी -मुलं जमली आणि मराठी शाळेचा झेंडा रोविला गेला!

गेल्या अकरा वर्षात दोनाचे दहा गट झाले आणि तीसाचे एकशे पन्नास.

तेव्हांपासून मुलांची मराठी शाळा सुरू झाली आणि आम्हां शिक्षकांची प्रयोगशाळा!

५ ते १५ वयाची मुलं मराठी शाळेत फक्त दीड तास घालवतात. उरलेले ६ दिवस आणि साडेबावीस तास त्यांच्यावर इंग्रजी भाषेचा अंमल असतो. त्या दीड तासात, व्याकरण, सणवार, संस्कृती, शब्दसंपत्ती … भाषेची अनेक अंगे शिकवायची म्हणजे कठीणच होते. एवढं करून वर्षाच्या शेवटी मुलांना मराठी बोलता आले पाहिजे, त्याहीपेक्षा मराठीची गोडी लागली पाहिजे. त्यासाठी शिक्षक वेगवेगळ्या क्लुप्त्या लढवतात. कल्पकता दाखवून मुलांना भाषेच्या अभ्यासात दंग ठेवण्याचा प्रयत्न करतात. शब्दांची अंताक्षरी, एकच अक्षर देऊन त्यापासून सुरू होणाऱ्या शब्दांचा खेळ, (आ …आई, आवाज, आगगाडी …)

मराठी Wordle, Connection (NYT) वा Hangman सारखे खेळ तयार करणे. एक शिक्षक मुलांना ‘hands on’ मराठी शिकवण्यासाठी सतत वेगवेगळे उपक्रम योजतात. एकदा वर्गात ‘रुचिरा’ नेऊन मुलांना वाचायला दिले. प्रत्येक मुलाने एक पाककृती वाचली, त्यातून वाचन सुधारले आणि पदार्थ-ओळख झाली. अमेरिकन शिक्षण पद्धतीचा हात धरून इथे मराठी भाषा रुजते आहे, शिक्षकांच्या प्रयोगशीलतेमुळे फोफावते आहे.

पुढील पानावर एक वेगळा, मजेशीर निबंध आहे. पहिल्या बाकावर बसलेल्या पहिल्या विद्यार्थांकडून निबंधाची सुरुवात होते. सुचेल ते वाक्य तो लिहितो आणि कागद पुढे सरकवतो. शेजारची विद्यार्थिनी पहिल्या वाक्याशी सुसंगत एक वाक्य लिहिते आणि तो कागद -पुन्हा - पुढे सरकवते. अशी वाक्यांची शृंखला निबंध रूप धारण करते. मुलं मिश्किल आहेत, आणि ११ ते १४ वयाची आहेत!

**– ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर**
**(ट्रॉय मराठी शाळा)**

## काय झाले?

**लेखक/लेखिका - इयत्ता चौथी:**

कार्तिक रसाळ,
श्रेयस जैन,
पूर्वा चव्हाण,
नैत्या भरणे,
मल्हार बागाईतकर,
मीत पाटील,
स्वरित भिलारे,
अथर्व केदार-
डोंगरकर,
हर्षल खर्चे,
क्रिशांग पाटील,
प्रभव कुंभार,
अद्वैत पाटील,
सर्वेश झोपे,

आज सकाळी खूप बर्फ पडला.
इतका पडला की शाळा बंद होती. समळ्या
मुलांना आनंद झाला. मी मित्राबरोबर
बाहेर खेळायला गेलो. आम्हांला
खूप मजा आली. नंतर मी एका
घरावर अंडे फेकले. मी त्याच्याबरोबर
अंडे नाही, पण मी चेंडू फेकला. मी स्नोमॅन
पण बनवला.
नंतर मी घरी गेलो. आईने केलेले
जेवण जेवले.
मी जेवण साठी तळलेली कोमबडी
खाली होती; पन कोमबडी खुप छोटी होती.
त्यामूळे मी जेवण झाल्या वर चिप्स खाल्ले.

# Bhushan Kulkarni & family
## Wishes you all



PATEL BROTHERS®

*Wishes you all*






शुभ
दिपावली


Yummy In Tummy
with Saroj
Freshly made Sweets & Savory Goodies
for all occasions
Sharing Homemade Happiness !
Facebook / Instagram: YummyInTummyWithSaroj
WhatsApp/Text/Call @ 734-497-9067


शुभ दिपावली


Looking to
Buy or Sell
Your Home?
Call Priyanka Dabhi today for all your
real estate needs—buying, selling, or
even just looking for a home.
kw
Priyanka Dabhi
KW Professionals
REALTOR®
(734) 331-5666
priyanka4realestate@gmail.com
www.pdabhi.kw.com

# गोधडीचे पापुद्रे

आईच्या घरात कपाटं साफ करत होतो. सगळं बाहेर काढत होतो. काय टाकायचं, काय ठेवायचं, काय द्यायचं. आणि तिथे, कपाटाच्या अगदी खालच्या कप्प्यात एक मलमली कपड्यात गुंडाळून ठेवलेली ती माझी गोधडी सापडली. आत चंदनाचा छोटा सॅशे. किती जुनी होती आठवत नाही, काहीशी विटलेली… आणि तरीही एकदम ओळखीची.

मी ती उचलली. आणि क्षणार्धात – माझं बालपण, शाळा, कॉलेज, घर, आई, ताई, छोटं बाळ – डोळ्यासमोर आठवणीची गर्दी झाली. जणू त्या गोधडीच्या टाक्या-टाक्यात एक एक आठवण शिवलेली होती. घडीसरशी आठवणींचे पापुद्रे हळुवारपणे उलगडायला लागले.

पु, लं. म्हणतात ते खरंच आहे. मुंबईत थंडी नसतेच. म्हणजे असते अधेमधे कधीतरी, पण अगदी 'मूडमध्ये असली तर.' बाकी उन्हाळा आणि पावसाळा हेच आपले डिफॉल्ट सेटिंग्स. आता पावसाळ्यात रस्ता चुकल्यासारखा येतो गारवा थोडे दिवस. पण म्हणाल तशी कडक थंडी नाहीच. तरीही मला ती गोधडी लागायची. आई दर हिवाळ्यानंतर वुलनची ब्लँकेटं डांबराच्या गोळ्यांची पाकीटं घालून एका खणात नीट आवरून ठेवायची. दुसऱ्या खणात आईचे किमती शालू असायचे. दर उन्हाळ्यात त्यांना ऊन दाखवून, घडी उलगडून, प्रत्येकात एक चंदनाचा छोटा सॅशे घालून आईने ते जपले होते.  माझी गोधडी मात्र कधीच आवरली जायची नाही. ऋतू कोणताही असो, वरती फूल-फॅन हवाच असायचा मला. त्यामुळे योग्य उब राखायला गोधडी परफेक्ट होती.

तुम्हाला खरं सांगते. माझं त्या गोधडीवर प्रेम इतकं, की अमेरिकेला येताना मला तिला सोबत घेऊन येता आलं नाही ह्याची खंत होती मला. पण दरवेळी भारतात आले की ती गोधडी पुन्हा माझ्या अंगावर असायची. आईला ही ठाऊक होतं. दर वेळेस आधीच धुऊन ठेवायची. आणि तरी म्हणायची, "काय गं! अजूनही हवीच ही गोधडी? आता तरी सोड ना!". माझं उत्तर ठरलेलं - "पुढच्या वेळी बघू, आई." आणि ती सुद्धा हसत हसत गोधडी पुन्हा ठेवून द्यायची, अगदी काळजीपूर्वक.

आई नेहमीच साडी नेसायची - घरातही आणि बाहेरही. बाहेरची साडी कुठलीही असो, घरातली साडी मात्र कॉटनचीच असायची. दररोज धुतल्यामुळे अगदी मऊ-मऊ असायची. त्याच आईच्या जुन्या साड्यांचे तुकडे जोडून केलेली होती ही गोधडी. खूप साड्या होत्या त्यात. एक मऊ गुलाबी काठाची, एक हिरवळीवर फुलांची, एक जरा पिळदार केसरी – प्रत्येक साडीची कथा होती. वापरुन गोधडी विरल्यासारखी वाटायला लागली की आई डागडुजी करून अजून एका साडीचे तुकडे जोडायची. नवीन तुकडे असे काही जुळायचे की गोधडीचं रंगरूप पालटून जायचे.  माझ्या लहानपणी आई स्वयंपाक करत असताना, काम करत असताना, मी तिच्या पदराला जणू लटकलेली असायचे. ती सारखी हात कसा धरणार? म्हणून मीच पदर पकडून फिरायचे म्हणे. त्या पदराला धरून घरभर फिरायचे, आई मागे चालत तिला "काय गंमत झाली माहितीये!" सांगायचे, एकटीच पदारसोबत लपंडाव खेळायचे, अगदी 'आईची शेपटी'!

बाहेर स्वरूपी आईच्या अनेक जुन्या साड्या गोधडीमध्ये बदलल्या असतील. पण खरं सांगू का? प्रत्यक्षात एकेका टाक्यात नवीन आठवणी शिवल्या गेल्या होत्या.

मला आठवणारी पहिली आठवण म्हणाल तर - पुण्यात आईच्या मामाचं अचानक निधन झालं. सगळ्या मोठ्या माणसांना तातडीने तिथे जाणे गरजेचं होतं. मुलं त्या वातावरणात नको असा निर्णय झाला. आम्हा सगळ्या मावस-मामे भावंडांना मनू मावशीकडे ठेवण्याचे ठरलं. सगळ्यात मोठा जयुदादा चोवीस-पंचवीस वर्षाचा. मी सगळ्यात लहान – अवघी तीन-चार वर्षांची. सगळ्यांना काळजी होती की मी आईला आठवून भोकांड पसरलं तर काय करायचं?  म्हणून जयुदादा म्हणाला, "तिला रमवू, सगळे सिनेमा बघायला जाऊ". आणि ठरलं – मी ठरवेन तो सिनेमा. बाकी सगळ्यांनी डोक्याला हात लावला – "अरे ही चिमूरडी काय ठरवणार! हिला कुठे काही कळतं त्यातलं?" त्याला खूप समजावण्याचा प्रयत्न केला सगळ्यांनी. पण तो काही बधे ना - त्याने वर्तनमानपत्र उघडलं आणि सिनेमाच्या जाहिराती असतात ते पान काढलं . मी ठेवलं बोट –"वॉरंट." सगळे हसले! पोरगी हुशार निघाली. 'चित्रा' थिएटरला सगळे पोहोचलो. शेवटच्या रांगेतली तिकीटं होती. मी खुर्चीवर बसले आणि आली की हो पंचाईत! अहो, मला काहीच दिसत नव्हतं. माझी ऊंची ती किती असणार! कसा दिसणार मला स्क्रीन! दादाने युक्ती लढवली - मला हळूच चढवून सीटच्या हाताच्या कठड्यावर बसवले.तो लाकडी – कडक! आता काय करायचं? तीन तास असं बसणे कठीण होतं. मग काय – माझी गोधडी आली कामी. दादाने दुमडून त्याची गादी केली. काय धमाल आली म्हणून सांगू! सिनेमाचं कथानक विचाराल तर एक गोष्ट माहीत नाही मला. पण थेटरमधली सगळ्यात बेस्ट सीट मात्र माझी होती! एकदम स्पेशल!

गोधडीची घडी आणखीन थोडी उघडली आणि आठवणीचा अजून एक पापुद्रा उलगडला. मी पहिल्यांदाच एकटीच कुसुममावशीकडे राहायला गेले. ह्या आधी ताई असायची माझ्या बरोबर. ह्या खेपेला मात्र ताई काहीतरी स्पेशल शिबिराला गेली होती. मी एकटी. मी आणि माझ्यासोबत माझी गोधडी.

कधी ती भातुकलीचं अंथरूण तर कधी आडोसा, कधी साडीचा पाट, कधी अंगावर ओढणं, कधी गादी. माझं घर, माझा खेळ, माझं रक्षण, सगळंसगळं काही. तिच्यावर, तिच्या सोबत, तिच्याशी मनसोक्त खेळायचे. थकले की तिच्यावरच  झोपायचे. ती इतकी मल्टीपर्पज होती की मावशी विचारायची - "हं, आज काय करायचं गोधडी बरोबर?" माझ्या कल्पनाशक्तीशी हुज्जत न करता दुजोरा देणारी इतकी चांगली मैत्रीण मला कुठे मिळणार होती!

जसजशी मी मोठी झाले, तशी उंची वाढली. गोधडी थोडीशी तोकडी पडायला लागली. पण माझी आई शिवणकलेची जादूगार होती. तिला कधीच सांगायची गरज पडली नाही. तिचं बरोबर लक्ष असायचं.  नव्या साडीचा तुकडे जोडून गोधडी बेमालूमपणे वाढत राहिली. जशी मी वाढले, तशीच ती पण. जशी मी बदलले तशी तीही. इंजिनियरिंगच्या दिवसांत, अभ्यास करत करत टेबलवरच झोप लागायची. आई कधी यायची आणि ती गोधडी नकळत माझ्या अंगावर टाकायची. कधी जाणवलं नाही की ती आली, पण तिची ऊब मात्र जाणवायची. जणू ती सांगायची – "मी आहे बाळा, तू कर मेहनत."

घड्या उलगडत होत्या आणि आठवणी पुन्हा पुन्हा दरवळत होत्या. डोळ्यासमोर तो दिवस समोर राहिला जेव्हा ताई हॉस्पिटल मधून तिच्या बाळाला घेऊन घरी आली.  माझ्या लाडक्या छकुलीसाठी काय करू आणि काय नको असं झालं होतं मला. किती गोजिरवाणी होती ती - जणू बाहुलीच. आईने तडी मारली होती "सारखी कडेवर घेऊन फिरू नको तिला. अंग वळून येतं बाळाचं." मांडीवर घेऊन बसावं तर वेगळी काळजी. मी होते हडकुळी (होते हो! आताच्या शरीरयष्टीवर जाऊ नका - तेव्हा होते!) आणि ती किती नाजूक. मला भीती वाटायचं की माझी मांडी तिच्यासाठी फार कडक तर नाही ना होणार? मग काय – माझी गोधडी पुन्हा कामी आली. दुमडून गादी बनवली. कधी मांडीवर, कधी कुशीत - माझ्या छकुली त्यावर अगदी अलगद रहायची. तिला सुद्धा गोधडी हवीहवीशी वाटायला लागली. मी अभ्यास करायचे तो सुद्धा बाळाला मांडीवर घेऊन – अर्थात, गोधडीवर. माझी लेक (ताईची लेक, टेक्निकली) आणि माझी गोधडी – दोघी सतत माझ्याच कुशीत. मी अमेरिकेत आल्यावर सुद्धा ती गोधडी तिच्याजवळच राहिली. माझ्या आठवणी सारखी.

"अगं देऊया ना आता ही. जुनी झालीये. रंग पण फिके झालेत"..  ताईचा आवाज आला आणि मी एकदम भानावर आले. गोधडी माझ्या हातातच होती. ती कितीही जड झाली तरी तिचं ओझं नव्हतं – ती तर माझी हक्काची सावली. ती जुनी झाली असेल, तिचे रंग विटले असतील, पण तिच्यातल्या आठवणी अजून तशाच होत्या.  रंगबिरंगी, उबदार, किमती, आणि अतिशय जपून ठेवलेल्या. म्हणून तर आईने त्यात चंदनाचा सॉशे घालून ठेवला नसेल ना?

मी अलगद तिला नाकाशी धरली आणि एक खोल श्वास घेतला.

सुगंध आला – साडीचा नव्हे.

आईच्या पदराचा. त्या पावसाळ्याचा.

त्या सिनेमाच्या कठड्याचा.

त्या अभ्यासाच्या रात्रींचा.

त्या बाळाच्या कुशीत झोपण्याचा.

माझ्या जीवनाच्या अनेक क्षणांचा.

कदाचित ह्यालाच स्मृतीगंध म्हणतात का?

"देऊया का?" ताईने पुन्हा विचारलं.

मी हसून म्हणाले,

"नको गं… पुढच्या वेळी बघू."



**– पूनम तोरगल**

# Gangadhar & Pushpa Vaishampayan

Wish you all



SENSORY

REHABILITATION

### OUR VISION

Our vision is to continually seek to be an exceptional, patient-centered healthcare staffing organization that you can always trust.

### OUR MISSION

Our mission is to meet the equitable needs of our clients so that they have the necessary resources to reach their highest potential.

### OUR SERVICES

We are premium provider of various health care services including physical therapy, occupational therapy, speech therapy, and nursing.

## ABOUT US

Healthcare industry works tirelessly to provide exceptional care to everyone in need while facing many challenges. Challenges related to staffing, in particular, have become complex over the years and this is why Sensory Rehabilitation, LLC was established in 2017.

We work to create and develop a supplemental workforce consisting of motivated, talented, and highly-qualified professionals who meet the needs of your patients and facility. We really focus on getting to know you and your organization prior to delivering a provider who is right for both you and your patients.

## WHY CHOOSE US?

- 8 YEARS IN HEALTHCARE STAFFING SERVICES.
- FOSTER A CULTURE OF CARE, TRUST, HONESTY, RESPECT, AND BENEVOLENCE.
- PLACEMENT IN HOMECARE AS WELL AS OUTPATIENTS SERVICES.
- MORE THAN 25+ H1 APPROVAL AND 5 GREEN CARD APPROVALS.

sensoryrehabservices.com

sensory18@gmail.com

4413, Reilly Ct, Troy, Michigan, 48085

248-719-4827

# Dr. Subhash Kelkar
# And Geetanjali Radio Program

Wishes you all
Deepawali Chya
Hardik
Shubhecha!



(Saturday 9am - 10am on
WPON 1460 AM)



# कितीदा नव्याने...

कितीदा नव्याने समजावले स्वत:ला
सोडू नकोस धीर, मार्ग होईल खुला
येईल तुझीही वेळ, येईल तुझाही क्षण
धर उभारी जरा, खचू देऊ नकोस मन

विश्वास ठेव ठाम, वेळ येते प्रत्येकाची
दुसऱ्यांच्या सुखात आनंद मान
हीच शिकवण मोठ्यांची

पण कधीतरी असे वाटते ना,
की आपलेही दिवस यावे,
दुसऱ्यांनाही आपल्या आनंदात
सहभागी करून घ्यावे

वाट तरी किती पहायची
आपली वेळ येण्याची
'भगवानके घर देर है, अंधेर नहीं'
ही ओळ किती वेळा आठवायची?

आपण चांगले वागलो की आपले चांगलेच होईल...
भीती वाटते कधीतरी, ह्या विश्वासालाच तडा जाईल

इच्छा असेल तर मार्ग सापडतोच
म्हणाल्या होत्या बाई
पण का कोणास ठाऊक
आता ते खरेच वाटत नाही...

दाटून येते मनात मळभ, आभाळ येते भरून
नकळत वाहतात अश्रू सर्व बांध फोडून
सुरू राहतो काही वेळ लपंडाव हा अश्रूंचा
कळत नाही कसा सुटतो, ताबा हा मनावरचा

पण मग एकदम कधीतरी, कळत नाही कसे,
आकाश होते निरभ्र, जणू काही झालेच नव्हते जसे
कळत नाही कुठून गोळा होतात सर्व आशा
मनातल्या विचारांना मिळते एक नवी दिशा

का नाही येणार आपली वेळ?
विचारू लागते मन
त्याला द्यायला माझ्याकडे
नसते एकही कारण...

त्याच वेळी दूर आकाशात
फुलत असते एक सुंदर पहाट
तिच्याकडे बघत मी
देते माझ्या मनाला साद..
देते माझ्या मनाला साद...




**– केतकी भाटे**

*Shubha Deepawali!*

**Dr Renu Pathak**

https://soulpelvicfloortherapy.com/

Ph : 248-710-3367

Soul
PELVIC FLOOR THERAPY


Proud to Support Those
Who Help So Many
HERITAGE
INSURANCE
With best compliments of Heritage Insurance Holdings, Inc.
and Vijay S. Walvekar, a Co-Founder and Director.
heritagepci.com
855-536-2744

*5% Discount for MMD Members*







Graham &
Ketkar, PLLC
शुभदिपावली
निमित्त आपणास सर्वाना
मंगलमय शुभेच्छा..!
रांगोळीच्या सप्तरंगात
सुखाचे दीप उजळून.!
लक्ष्मीच्या पावलानी घर
सुख समृद्धने भरूदे..!
Immigration Law Expertise
Supporting corporate employees and their families

# Attention Is All You Need

Nowadays, it's easy to feel stuck while everyone else is getting ahead -  so what if you had AI, but for your own brain?

**Here's what no-one is telling you about Transcranial Magnetic Stimulation**

*Writing essays, crafting images, generating videos, vibe coding etc.*; these are all Artificial Intelligence superpowers possible because of one thing: Attention is All You Need!



**Attention Is All You Need**

**Ashish Vaswani*** Google Brain avaswani@google.com
**Noam Shazeer*** Google Brain noam@google.com
**Niki Parmar*** Google Research nikip@google.com
**Jakob Uszkoreit*** Google Research usz@google.com
**Llion Jones*** Google Research llion@google.com
**Aidan N. Gomez*** † University of Toronto aidan@cs.toronto.edu
**Łukasz Kaiser*** Google Brain lukaszkaiser@google.com
**Illia Polosukhin*** ‡ illia.polosukhin@gmail.com

**Abstract**

The dominant sequence transduction models are based on complex recurrent or convolutional neural networks that include an encoder and a decoder. The best performing models also connect the encoder and decoder through an attention mechanism. We propose a new simple network architecture, the Transformer, based solely on attention mechanisms, dispensing with recurrence and convolutions entirely. Experiments on two machine translation tasks show these models to be superior in quality while being more parallelizable and requiring significantly less time to train. Our model achieves 28.4 BLEU on the WMT 2014 English-to-German translation task, improving over the existing best results, including ensembles, by over 2 BLEU. On the WMT 2014 English-to-French translation task, our model establishes a new single-model state-of-the-art BLEU score of 41.8 after training for 3.5 days on eight GPUs, a small fraction of the training costs of the best models from the literature. We show that the Transformer generalizes well to other tasks by applying it successfully to English constituency parsing both with large and limited training data.

*Equal contribution. Listing order is random. Jakob proposed replacing RNNs with self-attention and started the effort to evaluate this idea. Ashish, with Illia, designed and implemented the first Transformer models and has been crucially involved in every aspect of this work. Noam proposed scaled dot-product attention, multi-head attention and the parameter-free position representation and became the other person involved in nearly every detail. Niki designed, implemented, tuned and evaluated countless model variants in our original codebase and tensor2tensor. Llion also experimented with novel model variants, was responsible for our initial codebase, and efficient inference and visualizations. Lukasz and Aidan spent countless long days designing various parts of and implementing tensor2tensor, replacing our earlier codebase, greatly improving results and massively accelerating our research.

†Work performed while at Google Brain.

‡Work performed while at Google Research.




This paper is the reason that large language models (LLMs) like ChatGPT, Grok, Claude, and others you've encountered are transforming our world. Quite literally, b/c LLMs introduced the "Transformer" to equip these AI language models with Attention Mechanisms.

The result? Exponential improvement in the language model's ability to *recognize speech, generate natural language, retrieve information, etc.* - in other words, these models became the mini brains that we call AI.

**But is this really Artificial Intelligence?**

We are prompting the model to execute certain tasks for us (*e.g., searching information for answering a question*), that <u>we otherwise would've performed ourselves</u>. So instead of Artificial Intelligence, this is more like an Amplification of our Intelligence, but **externally.**




And when our brain's Attention Mechanisms are "transformed" after TMS is applied over the Prefrontal Cortex, our Intelligence is also Amplified - this time, **internally.**

The result?

**The Brain: Amplified Intelligence x Transforming Attention**

Like AI - the outcome of a **specific** goal you have in mind is ***achieved more quickly, more accurately, and more effectively*** when ***Attention is "transformed" with TMS***. Additionally, there are generalized **non-specific** benefits that you can enjoy without any particular goal directed intentions. *This happens because the TMS – in general – moves the Brain and Nervous System closer towards a healthy steady state equilibrium*.

**In other words, the TMS literally promotes Wellness.**

Here's what this can look for you, varying with the benefits ***most relevant to your demographic***:

| Young | Middle Aged | Elderly |
|---|---|---|
| Faster learning | Sharper Focus at Work | Improved Memory; less forgetfulness |
| Improved Test Scores | Greater Presence | Greater Spatial Awareness and reduced likelihood of falls |
| Better Sports Performance | Emotional Self-Regulation | Lower probability of Polypharmacy |

In closing, the example four step process below illustrates how you might take advantage of TMS by "transforming" your Attention to Amplify Intelligence and improve your test scores.




– डॉ. प्रणव जगताप

kw CENTRAL
KELLERWILLIAMS.
35427 Dodge Park Rd. Sterling Heights, MI 48312
SELL IN A FLASH, CALL KASH!



**REALTOR®, KASHMIRA DESAI**

**YOUR METRO DETROIT EXPERT**
**View What is *ACTIVE, PENDING & SOLD* in your Neighborhood go to www.kashmira.kwrealty.com**

**Cell (248) 974 6979 Office (248) 655-7955**
**realtor.kashmira@gmail.com**

Each Keller Williams Office is Independently Owned and Operated

Veg O Rama

dwarkamai
KITCHEN

**Contact: 734-776-8492** 5063 LIVERNOIS ROAD TROY MI 48098
VORTroy, DMK5063@gmailcom




RASNA

FOODS




# College Comfort Done *right.*

**The InduraDream Topper is the upgrade your student deserves.**

- ✓ 3 inches of breathable, body-aligning comfort
- ✓ Zero toxic foam, zero heat-trapping
- ✓ Dorm- and apartment-approved
- ✓ Fast, free shipping + 30-day trial

SCAN TO VISIT OUR WEBSITE

# Happy Diwali Wishes





KARMA REALTY
HOLDINGS LLC
ARCHITECTURAL CONSERVATION THROUGH URBAN LIVING AND WORKING SPACES




# मी "लक्ष्मण" झाले तेव्हाची गोष्ट

छे....छे ...मी काही नाटकामध्ये लक्ष्मणाची भूमिका केलेली नाही किंवा "येनटेल" सिनेमाप्रमाणे नोकरी मिळविण्यासाठी पुरुषी कपडे व मेकअप केला नाही, किंवा काही हॉलीवूडच्या सेलेब्रिटींप्रमाणे लिंगबदल शस्त्रक्रियाही करवून घेतलेली नाहीये. (तुम्ही म्हणाल की ही जवळ-जवळ पंच्याहत्तरीची म्हातारी कै च्या कै काय लिहितेय? पण, पुढे वाचा.... )



रामायणामधील ती कथा आठवते का- सीतामाईने लक्ष्मणरेषा ओलांडली आणि रावणाने तिचे अपहरण केले. पुष्पक विमानातून बळजबरीने नेतांना रामचंद्रांना शोध घेण्यात मदत व्हावी म्हणून लंकेच्या मार्गावर तिने आपले दागिने विखरून टाकले. पुढे वानरसमूहाने हे सारे एकत्र केले व शहानिशा करण्यासाठी राम-लक्ष्मणांपुढे ठेवले. लक्ष्मण विनयपूर्वक म्हणाला "मी फक्त सीतादेवींची पैंजणे ओळखतो. कारण रक्षणार्थ त्यांच्या मागून चालतांना माझे लक्ष केवळ त्यांच्या चरण कमळांकडे असते. त्यामुळे ही पैंजणे त्यांच्याच पायातील आहेत हे निश्चित."



नॉर्वे देशाच्या सहाशे मैल उत्तरेला असलेल्या स्वालबार्ड या उत्तर ध्रुवाजवळच्या द्वीपसमूहामध्ये ट्रेकिंग करतांना मला फक्त पुढे चालणाऱ्या पॉलीनचे दणकट मकबूट दिसत होते व मागून सांभाळून नेणाऱ्या जोसेफचा आश्वासक आवाज ऐकू येत होता..."पायाची टाच आधी खाली". पॉलीनच्या बुटांनी तयार केलेल्या बर्फातील खड्ड्यांमध्येच मी पाय ठेवून चालणे हे सगळ्यात सुरक्षित होते आणि त्यातल्यात्यात आधी टाच घट्ट रोवून मगच सगळ्या पायावर भार टाकायचा. या चालीवर जीव दोन हातामधल्या दोन काठ्यांवर ठेवून मी एकेक पाऊल उचलत होते. भोवताली अनुपम अशा निसर्गाचे साम्राज्य पसरले होते. गगनाला भिडणारे हिमाच्छादित पर्वत, दूरवरच्या हिमनद्या, पाण्यात निःशब्द तरंगणारे नीलमनोहर हिमनग, या साऱ्यांचे तात्पुरते विस्मरणच झाले होते. कारण कुठेही न धडपडता हा ट्रेक पूर्ण करण्याचे आव्हान समोर होते. हाड-बीड मोडले तर हेलिकॉप्टरने कमीत कमी सहा-सातशे मैल उडत जावे लागणार होते.

पॉलीन माझ्यापेक्षा दहापंधरा वर्षांनी लहान, पण खूप अनुभव असलेली, कसलेली गिर्यारोहक. ती आपल्याच अंगणात बागडावे अशा सहजतेने बर्फातून, चिखलातून, सुळसुळणाऱ्या दगड-धोंड्यांमधून हळूहळू चालली होती- माझ्यासाठी म्हणून. ट्रेकवर अर्धा-एक मैल गेल्यावर माझ्या डोळ्यांमधील भीती बघून पॉलीन व तिचा नवरा जोसेफ यांनी मला तात्पुरते दत्तक घेऊन टाकले. पॉलीनने मला पाय ठेवायला सोपा आणि सुरक्षित असा मार्ग तयार केला आणि मी घसरलेच तर मला सावरायला व धीर द्यायला जोसेफ मागून चालत राहिला, "आधी टाच, आधी टाच" असे गाणे म्हणत राहिला.

आमच्या पुढेच जरा टेचात चाललेली, लंडनहून आलेली डेबी एकदम बर्फात घसरली अन कमरेपर्यंत रुतून बसली. मग तिच्या आकारमानाला शोभेशा दोघा तिघांनी हरप्रयत्नाने तिला उपसून काढली. दहा पावलं गेल्यावर पुन्हा तेच! तिच्या काखेत धरून चार जणांनी तिला उभी केली. पण एकदा स्वतःच्या पायांवर उभी राहिल्यावर ऐटीने तिने जाहीर केलं "फक्त तुमची सर्वांची करमणूक करायला मी अशी धडपडते आहे." सर्वांनी हसतहसत तिच्या विनोदबुद्धीला दाद दिली आणि आमची वरात पुन्हा "आधी टाच" च्या तालावर चालू लागली.

आता पॉलीनच्या मकबुटांवरचे ओरखडे, रंग उडालेली ठिगळे, तिने एकावर एक घातलेले पायमोज्यांचे तीन जोड हे सगळे मला अगदी पाठ झाले होते. त्या बुटांवर लक्ष केंद्रित करून, जोसेफच्या आश्वासक तालावर शेवटी आम्ही गंतव्य स्थानावर पोहोचलो, तोपर्यंत एवढ्या बर्फातही मी घामाघूम झाले होते व माझे हात आणि पाय अतिश्रमाने थरथर कापत होते. हर्षभराने एकमेकांना टाळ्या देऊन आम्ही विजय साजरा केला. तिथल्या बर्फात बसकण घालून मगच मी भोवताली नजर टाकली आणि तो शुभ्रधवल सौंदर्याचा उत्सव बघून धन्य झाले.

आता पॉलिनचे मकबूट मी कुठेही, कधीही ओळखून काढीन - लक्ष्मणाने सीतामाईची पैंजणे ओळखली तशीच!

**–डॉ. वीणा शाह**



# Wish You all

HONEST

SKIP THE LINE, ORDER ONLINE

SCAN ME

TROY MI
248.315.0234






A J DESMOND & SONS
FUNERAL DIRECTORS

Trusted experts
creating custom goodbyes
reflecting love and life.

AJDesmond.com

TROY • CROOKS ROAD
between Maple & Big Beaver
248.362.2500

ROYAL OAK / BIRMINGHAM
WOODWARD AVENUE
between 13 & 14 Mile
*Vasu, Rodgers & Connell Chapel*
248.549.0500

TROY • ROCHESTER ROAD
between Big Beaver & Wattles
*Price Chapel*
248.689.0700

*memorials | cremation | burial | funerals*


GLOWING SMILES DENTAL
Dr. Kulbir (Nikki) Jassal, D.D.S.
1755 W Big Beaver Rd,
Troy, MI 48084
(248) 643-7530
www.glowingsmilesdental.com


EXPERIENCE THE LIFE
MI ADVENTURES'23
MI Adventures'23
Bring Adventure Dream to Reality !
Kailash Mansarovar Parikrama (KMP)
Mt. Kilimanjaro
Everest Base Camp
Great Migration Safari
TRIPS ALL OVER THE WORLD
Destinations : Kilimanjaro | Kailash Mansarovar Parikrama | Dolomites | Patagonia | Char Dham | Adi Kailash | 14er | US National Parks
We also customise Adventure, Spiritual and Leisure tours/trips as per your needs .
View all the trips at:
Contact :
Pankaj Dahad :
+1 248 854 2092
Visit us : www.miadventures23.com

# वर्षभराचे कार्यक्रम आणि मी



नमस्कार डेट्रॉईटकर!

सर्व महाराष्ट्र मंडळ सदस्य आणि त्यांच्या परिवार यांस दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.

वर्षभराचे कार्यक्रम आणि मी.

मंडळ म्हंटल्यावर बऱ्याच गोष्टी असतात. त्यात कार्यक्रम आणण्यापासून, नियोजन, विपणन, स्टेज व्यवस्थापन, लॉजिस्टिकस, आवाज, चलचित्र व त्यासाठी लागणारे व्यवस्थापन, सजावट, जेवण,नाश्ता, भरपूर लोक येणार म्हंटल्यावर आदरातिथ्य व त्याला लागणारे व्यवस्थापन, कार्यक्रम झाल्यावर लागणारे पुनरावलोकन, अशा अनेक गोष्टी असतात.
ऑफिसचे काम सांभाळून मंडळाचे काम करणे, प्रोग्राम प्लॅनिंग, मीटिंग घेणे. उपाध्यक्ष म्हंटल्यावर ही सगळी कामे येणारच. आमच्या अध्यक्षा वर्षाताई पाथरे यांनी सर्व कार्यक्रमांची अंमलबजावणी व्यवस्थित कशी होईल यासाठी भरपूर मेहनत घेतली. मी आणि रेणुकाने जमेल तसा हातभार लावला.

संक्रांतीचा कार्यक्रम छान झाला. आणि पुढच्या कार्यक्रमाचे नियोजन चालू करत असतानाच काही दिवस चालू असलेली पोटदुखी मोठ्या प्रमाणात वाढली आणि शस्त्रक्रियेसाठी अचानक भारतात जावे लागले. त्यातून डॉक्टरांनी ५ आठवडे घरी थांबायला सांगितल्यामुळे पाडव्याच्या कार्यक्रमासकट पुढचे २ कार्यक्रम चुकले. नंतर मात्र वर्षभराचे सगळे कार्यक्रम पिकनिक, नाटक, रसिकाचे कार्यक्रम मोठ्या संख्येने मंडळाच्या सदस्यांनी उपस्थिती लावून पार पडलेले मला पाहता आले.
उपाध्यक्षाच्या नजरेतून...

कार्यक्रम सगळे चोख पार पडले, महाराष्ट्र मंडळाच्या बऱ्याच लोकांनी त्या कार्यक्रमांचा लाभदेखील घेतला. पण कार्यक्रम झाल्यानंतरचे आटोपण्याचे काम असते जिथे स्वयंसेवकांची ( volunteer) ची टीम असते त्यांची धडपड हा खरा कार्यक्रम असतो, त्यामध्ये स्टेज आवरणे, वापरलेले सभागृह जसे दिले होते तसे परत देणे, जेवण केलेली जागा आणि त्याची साफसफाई करून देणे यासाठी बऱ्याच लोकांची गरज असते. यावर्षी काही कार्यक्रम झाले त्यात जेवण आणि साफसफाई बाबत थोडासा नाराज नक्कीच झालो. मंडळाचे कार्यकर्ते हे येणाऱ्या लोकांचे नोकर नाहीत याची जाणीव खरंतर कार्यक्रमाला येणाऱ्या सर्वांना असली पाहिजे. मराठी पद्धतीचे जेवण असते, ते सगळ्यांना आवडते आणि त्या जेवणाचा आस्वाद घेणे हादेखील कार्यक्रमाला जाणाऱ्यांची उद्देश असतो. पण मंडळ हे आपले घर आहे असे समजून आपण जर वागलो तर मंडळात काम करणाऱ्या स्वयंसेवकांना पण ते काम करणे बरे वाटेल याची जाणीव पाहिजे. कधी न मिळालेले जेवण अश्या पद्धतीने लोकांनी ताट वाढून घेऊन, भरपूर प्रमाणात अन्न घेऊन ते टाकून देण्यापासून व त्यानंतर अक्षरशः ताटली जमीनीवर पडेल आणि त्यातली रसभाजी किंवा भात बाहेर पडेल असे काही दिसण्यात आले. बरं हे सगळे १० माणसांचे नाही तर तब्बल ८००-९०० माणसांचे जेवण होते! त्यातल्या २०-३० % लोकांनी फारच अव्यवस्तिथपणा दाखवला. साफ करताना आम्ही बहुतेक करून भारतातील एका हॉटेल मध्ये साफ करणारे लोक आहोत असेच वाटत होते. तरीही ते काम आम्ही सर्वांनी मिळून केले. अहो जेवणाचे सोडा, आपण सभागृहात जिथे बसतो तिथे खाणे आणि पिणे वर्ज्य आहे हे ठाऊक असतानाही पाण्याच्या बाटल्या खुर्च्यांमध्ये अडकलेल्या नंतर दिसतात!
आपण भारतातून उच्च शिक्षण घ्यायला प्रगत आणि स्वच्छ देशात आलो आहोत याची कुठेतरी जाणीव असणे गरजेचे आहे.  मी इथे गेली ३ वर्ष आहे,  volunteers ची संख्या खूप कमी होत चालली आहे, हे मला जाणवतंय. हे कारण त्यामागे असू शकेल का? जसे आपण आपल्या घरी प्रत्येक सणाला घर स्वच्छ ठेवतो तसेच मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमाला सण समजून आपण तशी स्वच्छता ठेवू नाही शकत का?

पुढचा विचार

जे झाले गंगेला मिळाले, असे समजून पुढे वाटचाल करत राहणे हा आपला गुणधर्म आहे. पण मागे पाहून आपण काय चुकीचे केलं आणि आपण पुढच्या कार्यक्रमांना कसे व्यवस्थित राहता येईल याचा महाराष्ट्रातून एवढ्या लांब येणाऱ्या आणि इथे राहणाऱ्या सर्वांनी विचार करणे गरजेचे आहे.

आपल्या सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.

**– उपाध्यक्ष : देवेंद्र चितळे**


Great Cars.
Great Sales.
Great Service.
Two great locations with more brands ready to serve you!
SERRA
FORD ROCHESTER HILLS
Ford
serrafordrochesterhills.com
2890 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.852.0400
SERRA
BUICK GMC ROCHESTER HILLS
BUICK GMC
serrabuickgmcrochesterhills.com
855 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.651.5500


Suhana®
Happy Diwali
Suhana Manchurian Mix Indo-Chinese Mix
Suhana Paneer Tikka Masala Spice Mix
Suhana instant mix Khaman Dhokla
Suhana Vegetable Biryani Masala Spice Mix
Suhana Paneer Chilli Mix Indo-Chinese Mix
Suhana Coriander Powder
Suhana Pavbhaji Masala
Pravin Mango Pickle
Suhana Kitchen King Masala
Suhana Mild Chilli Powder Kashmiri
Pravin Date Tamarind Chutney
Suhana Red Chilli Sauce
Suhana Green Chilli Sauce
Pravin Samosa Chutney
SPICE UNIVERSE
SPICE UNIVERSE LLC
info@spiceuniverseusa.com
+1(947)267-1733
spiceuniverseusa.com

FORTUNE FOREVER

FINANCIAL SERVICES



Wishes you all



त्याचा, निळ्या रंगाने आच्छादलेला ब्रश कॅनव्हास वर सचोटीने फिरत होता. कॅनव्हासवरचं आभाळ भरून आलं होतं. त्याने दुसरा ब्रश घेऊन त्यावर अलगदपणे एका बाजूला पिवळा आणि दुसऱ्या बाजूने निळा रंग उचलला आणि कॅनव्हासवर भरून आलेल्या आकाशात पुसटसा सूर्य, जणू हार न मानता प्रकाशित किरणे ढगांच्या आरपार नेण्याचा प्रयत्न करतोय असा सूर्य, काढण्याच्या प्रयत्नांत तो मग्न होता.
खरं तर त्याला अर्धा तासात जॉब इंटरव्ह्यूसाठी निघायचं होतं. नेहमीप्रमाणे त्याची टाळाटाळ सुरु होती.
तेवढ्यात स्वयंपाकघरातून आईचा अपेक्षित आवाज आला ...
“अरे आज इंटरव्ह्यू ना? तुझ्यासाठी पोहे करून ठेवलेत ते खाऊन घे चल.”
तिकडून अपर्णाचा आवाज .."अहो शर्ट प्रेस करून ठेवलाय इथे. निघायचंय ना ..." .
तो मात्र शांतपणे पेंटिंग करत होता. त्याची ही शांतता त्याच्या आईला, अपर्णाला भयभीत करत होती. त्याचे वडील ते सगळं आरामखुर्चीत बसून बघत होते. त्यांचा चेहरा रागाने लाल झाला होता. तरी संयम ठेऊन त्यांनी अर्धा तास वाट बघितली. नेहमीप्रमाणे हा ढिम्म ... इंटरव्ह्यूची वेळ टळून गेली....
अपर्णाच्या डोळ्यातून टप टप अश्रू, तर आई देव्हाऱ्यात जाऊन हात जोडून बसली. वडिलांना आता हे असह्य झालं. ते उठले. तरातरा चालत त्याच्याकडे गेले आणि पस्तिशीला आलेल्या आपल्या मुलाला एक सणसणीत ठेवली.....
आता मात्र त्यांचा पण हात थरथरत होता आणि डोळ्यातून अश्रू वाहत होते......
त्याने ब्रश कॅनव्हासवर आपटला आणि कोणाकडे न बघता तो घरातून बाहेर पडला. मोटरसायकल भन्नाट स्पीडने चालवत तो त्याच्या आवडत्या ठरलेल्या तळ्याकडे निघाला. तिथे पोहोचताच मोटरसायकल फेकून धावतच तो पाण्याजवळ गेला आणि ढसाढसा रडायला लागला.

तिथे दूर एक ७०-७५ वयाचे आजोबा बसले होते. ते हे सगळं लांबून बघत होते. अर्धा तास झाला तरी त्याचं रडणं थांबेना. आता तर तो डोक्यावर हात मारून घेत होता आणि रडत होता.

ते आजोबा हळूहळू चालत त्याच्याकडे आले आणि त्यांनी त्याचा हात धरला.
हात धरताच तो ओरडून संतापून, त्यापेक्षा फ्रस्ट्रेट होऊन म्हणाला, "काय करू मी S S ?? हो, आहे मी सॉफ्टवेअर इंजिनिअर. अरे पण मला नव्हतंच व्हायचं. मला सतत वेगवेगळे रंग दिसतात. ब्रश दिसतात. मी रक्ताचा आर्टिस्ट आहे. अरे नाही करायचाय मला तो ९ ते ५ जॉब. नकोय मला ते पैसे आणि स्टेटस. का माझ्या मागे लागता? पैसा पैसा पैसा ... मी जगू शकतो कमी पैश्यात. सुंदर सुंदर पैंटिंग्स करून पुरेसा पैसा कमावून सुखी राहीन की मी .... जगू द्या हो मला माझ्या मना प्रमाणे.”
ढसाढसा रडणं थांबेना
आजोबा त्याच्याजवळ बसले. अजूनही त्याचा हात त्यांनी धरला होताच. तसेच बसून राहिले ते काही वेळ.
आता तो थोडा शांत झाला होता. मग हळूच आजोबांनी त्याला विचारलं कोणत्या प्रकारची पेन्टिंग्स करतोस तू?
तो: ॲक्रिलिक
ते: अरे वा. हुसेनजी सारखे पेन्टिंग्स की ...
तो: नाही नाही, मी निसर्ग वेडा आहे. मला सूर्य, चंद्र, नदी, डोंगर वेड लावतात.
ते: बरेच रंग लागत असतील मग ?
तो: हो. ...असे ना ..भरपूsssर रंग असावेत आणि वेगवेगळ्या प्रकारचे ब्रश... मग कॅनव्हास वर जादू करतो मी.
ते: “(हसत) मी फोटोग्राफी करायचो. कॅमेरा दिसला की वाटायचं मी कशालाही आणि कोणालाही सुंदर रूप देऊ शकेन ..... पण मी झालो चार्टर्ड अकाउंटंट.
तुला बघितलं आणि माझं तारुण्य आठवलं . खरं सांगू बाळा, माझ्यात धाडस नव्हतं माझ्या वडिलांना सांगायचं की मी माझ्या पैशाने जगून दाखवेन फोटोग्राफी करून. कमी पैशात राहण्याची तयारी नव्हती बहुतेक. लग्नाचं वय झालं

आणि लग्न केलं. आणि मग आपण घेतलेली जिम्मेदारी आपण साम्भाळायलाच पाहिजे म्हणून नोकरीला चिकटून राहिलो….."
"नाही नाही, मी फोटोग्राफी बंद नाही केली. जेव्हा वेळ मिळेल सुट्टी मिळेल तेव्हा कॅमेरा काढतो. लेन्सेस वर भरपूर खर्च करतो आणि खूप फोटो काढतो…. हो मी फक्त फोटोग्राफी केली असती तर कदाचित जास्त सुखी झालो असतो पण त्या वयात नाही झाली हिम्मत. सगळ्यांच्या विरुद्ध जाण्याचं धाडस नव्हतं. … पण एकदा गेलेली वेळ परत येत नाही . आणि गेलेल्या वेळेसाठी रडण्यात अर्थ नसतो. त्या पेक्षा मला जेवढ जमतं तेवढा वेळ मी मनमुराद जगतो आणि मग स्वतःने उभारलेल्या आयुष्याला सुद्धा मस्त उपभोगतो."

"आपल्या आयुष्याच्या घडामोडींसाठी आपण दोष कोणालाही देऊ शकतो. पण आपला राग हा फक्त आपल्यावर असतो. जनाशी खोटं बोलून राग काढू शकतो पण मनाशी खोटं कसं बोलणार?"

काही वेळ दोघेही शांत होते. करड्या आभाळातून सूर्य डोकावत विजयाची काही किरणे विस्फारून जणू हसत होता. तो ते विलक्षण सौंदर्य मनातल्या कॅनव्हास वर उतरवण्यात मग्न होता तर आत्ताच्या आप्त परिस्थितीला स्विकारुन एक यशस्वी रिटायर्ड चार्टर्ड अकॉउंटन्ट महागड्या कॅमेऱ्यात ते सौंदर्य टिपत होता .

**– पल्लवी सप्रे**

# Dr. Rajpurkar wishes you all






JAYA TRAVEL & TOURS

Europe Tours Starting at $1,999



*49 years of tour planning experience!*

To Book Call 1-800-209-0187 or Email letsgo@jayatravel.com

All-inclusive land packages with:

- Daily Indian vegetarian and non-vegetarian meals with Jain or Swami Narayan food available with request
- Guaranteed departure dates April through October
- Superior hotel accommodations
- Sightseeing, excursions, entrance fees, and transfers
- Jaya Travel tour manager throughout the tour

For details

# Diwali Chya Hardik Shubhecha!




Happy
Diwali!
Ram Creations
Jewelry & Gifts
FOLLOW US
28974 Orchard Lake Rd
Farmington Hills, MI
248.851.1400
www.ramcreations.com

# meijer

## Wishes you all

